## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक २९/०८/२०१३.**

नवी मुंबई महानगरपालिकेची सप्टेंबर **महिन्याची सर्वसाधारण मासिक सभा, शुक्रवार, दिनांक ०६ सप्टेंबर २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता** नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील ७ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१. इतिवृत्त कायम करणे.**

२. प्रश्नोत्तरे.

**३. वृक्षप्राधिकरणा**वर एका रिक्त होणा-या पदावर सदस्याची नामनिर्देद्वारे नियुक्ती करणे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**४.** नमुंमपा क्षेत्रातील नळजोडणीधारकांना आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांचे नियमन करणे.

**५.** नमुंमपा क्षेत्रातील सिडकोने बांधलेल्या विविध प्रकारच्या सदनिकांच्या वाढीव बांधकाम/वैयक्तिक बैठया घरांच्या पुर्नबांधणीच्या अनुषंगाने आकारण्यात येत असलेल्या बांधकाम वापराच्या पाणी देयकाच्या आकारामध्ये फेरबदल करणे.

**६.**नमुंमपा कार्यक्षेत्रातील सिडकोने तयार केलेल्या नोडल/सेक्टरल नकाशामध्ये सार्वजनिक वापरास्तवचे निदेशित केलेले नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत न झालेले भूखंड व त्या व्यतिरिक्त अन्य वापराचे मोकळे भूखंड सार्वजनिक वापरास्तव हस्तांतरीत करुन घेणे.

**ठरावाच्या सूचना :**

**७. श्री. दशरथ सिताराम भगत, यांजकडून :-**

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री व नवी मुंबईचे शिल्पकार कै. श्री. वसंतराव नाईक साहेब यांचा नवी मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावर (वाशी) पूर्णाकृती पुतळा उभारणे.

**८ व ९. श्री. मधुकर बाबु मुकादम, यांजकडून :-**

(८) प्र. क्र. ४०, इंदिरानगर, गणपतीपाडा येथे गणपती मंदिराच्या बाजुच्या परिसरातील गटारे सर्व जुनी झाली असुन पुर्ण भरलेल्या अवस्थेत बंद झाले आहे. तेथे नविन गटारे बनवून त्यावर ब्लॉक बसविणे. (९) प्र. क्र. ४०, पावणे गाव येथे मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नसुन पावणेश्वर आरोग्य केंद्राच्या मागील भूखंड मैदानासाठी राखीव असुन त्याला कंपाऊंड मारुन मैदान बनवून पावणे गावातील जनतेसाठी मैदान उपलब्ध करुन देणे.

**१० ते १२. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

(१०) नमुंमपा शाळा क्र. ३ आग्रोळी गाव येथील शाळेत सध्यस्थितीत बालवाडी ते इयत्ता ६वी पर्यतच्या विद्यार्थ्यांसाठी ७ वर्ग खोल्यांची आवश्यकता असून शाळेत फक्त ५ वर्ग खोल्या व १ कॉम्पुटर रुम आहे. तरी सध्यस्थितीतील विद्यार्थ्यांची संख्या व भविष्यात वाढणारी विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता वाढीव वर्ग खोल्यांची आवश्यकता आहे. तरी सदर शाळेवर एका मजल्याचे वाढीव बांधकाम करणे. (११) प्र. क्र.८१ मधील से.२९ आग्रोळी बेलापूर येथील भूखंड क्र. F१ व F२ च्या समोरील जागेवर मैदानासाठी राखीव असलेला भूखंड क्षेत्रफळ सुमारे ५०० चौ.मी. ते ७०० चौ.मी. असून हा भूखंड मात्र अगदीच लहान आहे. गावातील सार्वजनिक उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, सत्संग, लग्न समारंभ तसेच मैदानी खेळ स्पर्धा भरविणे ही सामाजिक गरज आहे. त्यामुळे सदरचा मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड रद्द करुन बाजुलाच असलेल्या से.३० व ३१ मध्ये सिडकोने भूखंड क्रमांक १४ हा मैदानासाठी आरक्षित केलेला आहे. सदर भूखंड आकाराने मोठा व मैदानी खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी योग्य असल्याने भूखंड क्रमांक १४ से.३० व ३१ सी.बी.डी., बेलापूर हा भूखंड पालिकेने हस्तांतरीत करुन घेवून ग्रामस्थांना आणि येथील नागरिकांना मैदान उपलब्ध करुन देणे.

(१२) प्र. क्र.८१ सी.बी.डी. से.१ येथे असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे उद्यान व से.९ रोहाऊस येथील एकता उद्यानाची दुरावस्था झाली आहे.उद्यानातील सिमेंटचे बेंचेस तूटलेले आहेत कूंपण भिंतीला भेगा पडल्या आहेत ग्रिल तूटलेले आहे. पाथवेच्या लादया तूटलेल्या आहेत. जंगली गवत वाढले आहे. तरी सदर उद्यानामध्ये शोभीवंत फुलझाडे लावून व्यवस्थित शेणखत घालून उद्यानातील दुरुस्ती व देखभाल करणे.

**१३ व १४. श्री. सुरेश गोपाळ शेट्टी, यांजकडून :-**

(१३) नमुंमपाच्या वतीने मा. उच्च न्यायालय मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे तालिका वकीलांन मार्फत बाजू मांडली जाते. महत्वाच्या न्यायलयीन प्रकरणात नियमीत वकीलाबरोबर त्यावेळी उपलब्ध असलेल्या वरिष्ठ वकीलांची (Senior Counsil) नियुक्ती करणे. (१४) न्याय प्रविष्ठ नसलेल्या तसेच न्यायालयात प्रलंबित असलेल्या मात्र जैसे थे आदेश नसलेल्या न्यायालयीन प्रकरणाबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची एम.आय.डी.सी. व सिडकोच्या धर्तीवर तांतडीने नियुक्ती करणे.

**१५ ते १७. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून:-**

(१५) नेरुळ, सेक्टर १९अे, नाल्यालगत फुटपाथची सुधारणा करणे. (१६) नेरुळ, सेक्टर १९अे, मधील नाल्यास संरक्षक कठडे तयार करणे. (१७) नेरुळ, सेक्टर १९अे, मधील फुटपाथवर असणा-या सर्व झाडालगत बैठक व्यवस्था करणे.

**१८ ते २०. सौ. कविता भरत जाधव, यांजकडून :-**

(१८) नेरुळ सेक्टर- ४६ए भूखंड क्र.६ हा अंदाजे ५ हजार चौ.मी. मैदानाचा भूखंड नुकताच सिडकोकडून महापालिकेस हस्तांतर झाला आहे. तरी सदर भूखंडावर मैदान विकसित करावे. त्याकरीता आवश्यक असणारी सर्व कामे करण्यात यावी. उदा. सुरक्षा भिंत, पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था, मैदानातील डेब्रीज साफसफाई, मैदान विकसित, प्रवेशद्वार व त्यासंबधित आवश्यक असणारी सर्व कामे करणे. (१९) नेरुळ सेक्टर- ४६, ४६ए व ४८, ५० पुर्व/पश्चिम मधील उर्वरीत सर्व रस्त्यांची दुरुस्ती करणे. (२०) नेरुळ सेक्टर- ५४, ५६, ५८, ५८ए मधील सर्व रस्त्यांची दुरुस्ती करणे.

**२१ ते २३. श्री. बहादुर त्रिलोक सिंह बिस्ट, यांजकडून :-**

(२१) एम.आय.डी.सी. रोड ते इलठणपाडा स्मशानभुमी पर्यंत अंदाजे ८०० मी. लांबीचा व ७ मी. रुंदीचा कच्चा रस्ता कार्यरत असुन सदर रस्त्याची जमीन मालकी हक्काची असल्याकारणाने तिथे नमुंमपाद्वारा डांबरी रस्ता बनविण्यात अडथळा निर्माण होत आहे. सदर रस्त्याची जमीन जमीन मालकाकडून विकत घेऊन डांबरी रस्ता व रस्त्यालगत सार्वजनिक शौचालय बनविणे. (२२) इलठणपाडा प्रभागात इलठणपाडा भागातील संपुर्ण गटारे व पदपथ बनविणे. (२३) प्रबोधन विद्यालय समाजमंदिर ते भोला यादव कन्हैयानगर अंदाजे ४०० मी. लांबीचा व ५ मी. रुंदीचा रस्त्याचे डांबरी रस्ता बनवून मिळावे तसेच नाल्यावर वाहतुकीकरिता वाहनपूल बनविणे.

**२४ ते २६. श्री. काशिनाथ जनार्दन पाटील, यांजकडून :-**

(२४) नमुंमपाचे बेलापूर महानगरपालिका असे नामकरण करणे. (२५) प्र. क्र.६५, जुईनगर सेक्टर २३ येथे असलेल्या स्मशानभूमी भोवती असलेली जुनी संरक्षण भिंत तोडून त्या ठिकाणी नविन भिंत बांधणे. (२६) प्र. क्र.६५, जुईनगर सेक्टर २३ मध्ये ठराविक ठिकाणची गटारे काढुन व पाथवे कमी करुन हेवी डयुटी गटारे बांधणे.

**२७ ते २९. श्री. बाळकृष्ण चाहू पाटील, यांजकडून :-**

(२७) प्र. क्र. २० मध्ये से. २९ व से. ३०, वृंदावन सोसायटीजवळ गोठवली गावाच्या नावाची मोठी कमानी बांधणे. (२८) प्र. क्र. २० मध्ये से. २९, वाघेश्वर मंदिराजवळ गोठवली गावाच्या नावाची मोठी कमानी बांधणे. (२९) प्र. क्र. २०, रबाळे रेल्वे स्टेशन पासुन गोठवलीला जाणाऱ्या रस्त्यास गोठवली गावाच्या नावाची मोठी कमानी बांधणे.

**३० ते ३२. श्री. रंगनाथ कारबारी औटी, यांजकडून :-**

(३०) प्र. क्र. ६६ मधील सेक्टर २५ मधील सप्तश्रृंगी सोसायटी ते से. २४ रेल्वे पंचरत्न सो. पटरी (कारशेड) पर्यंतच्या पूर्ण रस्त्याचे दोन्ही बाजूच्या पदपथ तयार करुन पूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करणे. (३१) प्र. क्र. ६६ मधील सेक्टर २५ मधील दर्शन सोसायटी ते भारत सोसायटी (स्वामी समर्थ मठ पर्यंत ) नवीन पदपथ तयार करणे. (३२) प्र. क्र. ६६ मधील सेक्टर २४, २५ मधील सिडकोने बांधलेल्या सोसायट्यांमध्ये कंडोनियम अंतर्गत असलेल्या निधीचा वापर करुन सोसायटी मधील मोकळ्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे.

**३३ ते ३५. सौ. विजया रामचंद्र घरत, यांजकडून :-**

(३३) नमुंमपाच्या नियोजन धोरणानुसार महापालिकेच्या मालमत्ता काही संस्थांना, महिला मंडळांना भाडेतत्वावर दिल्या गेल्या आहेत. त्यापैकी शांता महिला मंडळ, तुर्भेगांवातील प्रकल्पग्रस्तांचे असून नवी मुंबईतील सर्वात जूने मंडळ आहे. सदर महिला मंडळाला प्लॉट क्र. ३३७ वरील मालमत्ता तुर्भे ग्रामपंचायतीने कायमस्वरुपी वापरास दिली होती. सदर मालमत्ता आता पालिकेकडे वर्ग झाली आहे. तरी केंद्र व राज्य सरकारच्या ध्येयधोरणानुसार महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण करणेकरिता सदर मालमत्ता शांता महिला मंडळाला कायमस्वरुपी नाममात्र अनामत व भाडे आकारुन देणे.

(३४) प्र. क्र.५८ तुर्भेगांव मधील प्लॉट क्र.३३७ वर पालिकेमार्फत केंद्र व राज्य सरकारच्या धोरणानुसार महिलांचे उच्चाटन व उत्कर्ष होणेकरिता महिला मंडळ करिता इमारत बांधणे. (३५) तुर्भे प्रभाग क्र.५८ मधील तुर्भे गावठाण विस्तार अंतर्गत शितलादेवी परिसरातील वापरात नसलेले, मोडकळीस आलेले दुर्गंधीयुक्त शौचालय पाडून त्या ठिकाणी महिला बचत गटाकरिता इमारत बांधणे.

**३६ ते ३८. सौ. वंदना दिपक सोनावणे, यांजकडून :-**

(३६) प्र. क्र. ६२ मधील औद्योगिक परिसरात व महात्मा गांधी नगर येथील गटारे पावसाच्या पाण्यामुळे व डोंगरावरील वाहून आलेली माती गटारामध्ये साचली असून सर्वत्र गटारे फुटलेल्या अवस्थेत आहेत व कंपन्याचे सोडलेले दुषित पाणी हे रस्त्यावर वाहत आहे. त्याकरिता गटाराची दुरुस्तीचे कामे करणे. (३७) प्र. क्र. ६२ मधील बोनसरी गाव येथील भारत स्टोन कंपनीकडे राहणा-या रहिवाशंना नाल्यामधुन जावे लागते त्यांच्या सुविधेकरिता नाल्यावर ब्रिज बांधणे. (३८) प्र. क्र. ६२ मधील औद्योगिक परिसरात ड्रेनेज लाईन फुटलेल्याचे प्रमाण बऱ्याच ठिकाणी असून हया परिसरातील रस्त्यावर घाण वाहत आहे त्याकरिता जुनी ड्रेनेज लाईन बदलणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक २९ ऑगस्ट २०१३.**